भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

## कालावधी (दिनांक २०.०३.२०२१ ते २४.०३.२०२१)

| अंक २३/२०२१ | | | | | | | दिनांक १९.०३.२०२१ | | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१२/०३/२०२१ ते १८/०३/२०२१ पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २०.०३.२०२१ ते २४.०३.२०२१ पर्यंत) | | | | |
| १२/०३ | १३/०३ | १४/०३ | १५/०३ | १६/०३ | १७/०३ | १८/०३ | दिनांक | | २०/०३ | २१/०३ | २२/०३ | २३/०३ | २४/०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | | ० | ० | ० | १ | २ |
| ३६.५ | ३६.५ | ३७.० | ३७.० | ३७.० | ३६.० | ३६.० | कमाल तापमान (अं. से) | | ३७ | ३६ | ३३ | ३५ | ३८ |
| १८.५ | १८.५ | १९.० | १९.५ | २१.० | २१.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | | २४ | २२ | २२ | २३ | २३ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | २ | १ | १ | १ | ० |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | | |
| ९३ | ९३ | ९१ | ९१ | ९५ | ९१ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | | ५२ | ६० | ७३ | ७१ | ८० |
| ४७ | ३६ | ४३ | ५२ | ५६ | ५२ | ५४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | २८ | २३ | ३१ | ३३ | ३३ |
| १.४ | १.९ | २.० | १.८ | १.९ | १.६ | १.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ००८ | ००९ | ००४ | ००३ | ००६ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | दक्षिणे कडे | दक्षिणे कडे | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | पुर्वे कडे | पुर्वोत्तर/ आग्नेये कडे |
| पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०२०) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४८६०.० | ११.६ | ०.० | ०.० |

| | |
|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे तर २४ मार्च, २०२१ रोजी तुरळक ठिकाणी फक्त हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आर्द्रते मध्ये घट होण्याची शक्यता आहे. तसेच हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| इशारा | सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे असा ईशारा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून देण्यात आलेला आहे. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | जिल्हयामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने येत्या २ दिवसात तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | सिंधुदुर्ग जिल्हयात २२ व २३ मार्च रोजी मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह हलक्या पाऊसाची शक्यता आहे. काढणीस तयार आंबा फळे ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | फळधारणा ते काढणी | जिल्हयामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने येत्या २ दिवसात तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>येत्या ५ दिवसांमध्ये तापमान वाढ संभवत असल्यामुळे तापमान वाढीमुळे हापुस आंबा फळांमध्ये साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर काढावीत व सावलीत ठेवावीत.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता आंब्यातील फळगळ टाळण्यासाठी फळांना विद्यापीठ शिफारसीनुसार कागदी पिशव्यांचे आच्छादन करण्यात यावे.<br>ढगाळ व पर्जन्यसदृश्य वातावरणाची शक्यता लक्षात घेता अपरीपक्व व काढणीस तयार न झालेल्या फळांवर पाउसामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊन डाग पडु नये व नुकसान होऊ नये यासाठी आंबा पिकावर कार्बेन्डेझीम ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) किंवा थायोफिनेट मिथिल ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) किंवा प्रोपिनेप ७५ टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (२० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची गरजेनुसार फवारणी करावी.<br>फळे पिकात घालताना फळ कुजीचा प्रादुर्भाव वाढु नये यासाठी फळांना उष्ण जल प्रक्रिया द्यावी. त्यासाठी फळे ५२° से. तापमानाच्या पाण्यात १० मिनीटे बुडवुन नंतर आडीत घालावीत.<br>ढगाळ व पर्जन्यसदृश्य वातावरणाची शक्यता लक्षात घेता फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसित केलेले मिथिल युजिनॉलयुक्त रक्षक सापळे प्रती हेक्टरी चार याप्रमाणात आंबा बागेमध्य लावावेत.<br>जिल्हयामध्ये काही ठिकाणी तापमान वाढीमुळे आंब्यामध्ये वाटाणा, गोटी व सुपारीच्या आकाराच्या आंबा फळांची गळ आढळुन आलेली |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. त्याचबरोबर जिल्हयामध्ये दुपारची आर्द्रता कमी झालेली आहे. पुढील आठवडयात दुपारची आर्द्रता कमी राहण्याची शक्यता आहे. पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रति झाड ८०-१०० लि. पाणी ७ दिवसांच्या अंतराने दयावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे व पालापाचोळ्याचे अच्छादन दयावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| काजु | फळधारणा ते काढणी | दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता काजूमध्ये ज्या ठिकाणी काढणीयोग्य बी तयार झालेली आहे अशा ठिकाणी तयार झालेल्या बीयांची काढणी व वेचणी करुन ती येत्या २ दिवसात लवकरात लवकर करुन घ्यावी व बीया उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवाव्यात.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नविन लागवड केलेल्या काजु कलमांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता काजुच्या मोठया लागत्या कलमांना १५ दिवसाच्या अंतराने १५० - २०० लीटर पाणी प्रति कलम याप्रमाणे द्यावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या कलमांना पहिल्या २ वर्षात उन्हाळयात ८ दिवसांच्या अंतराने ३० ली. पाणी प्रति कलम याप्रमाणे द्यावे. |
| नारळ | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नारळ बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नविन लागवड केलेल्या नारळ रोपांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्याने पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस नरसाळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| सुपारी | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता सुपारी बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल तापमानात किंचीतशी घट तर किमान तापमानात वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता नविन लागवड केलेल्या सुपारीच्या रोपांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| वायंगणी भात | फुलोरा | भात शेतीची कोळपणी करुन शेतीची बेणणी करावी. भात पिकास २० कि. ग्रम नत्र खताचा तिसरा हप्ता पिक फुलो-यात असताना द्यावा.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता उन्हाळी भात पीकामध्ये पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे करावे. लोंब्या येण्यापूर्वी १० दिवस अगोदर व लोंब्या आल्यानंतर १० दिवसांपर्यंत शेतामधील पाण्याची पातळी १० से.मी. पर्यंत ठेवावी.<br>भातावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास ट्रायसायक्लॅझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| भुईमुग | आरा अवस्था | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात ब-याच अंशी वाढ होऊन आद्रतेमध्ये होणारी घट लक्षात घेता बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पीकाला पेरणीनंतर १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. त्याचप्रमाणे लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी पीकावर पिंप फिरवावे त्यामुळे आ-या जमिनीत जाण्यास व शेंगा चांगल्या प्रकारे पोसण्यास मदत होते. |
| कुळीथ | काढणी | दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता कुळीथ पिकाची काढणी येत्या २ दिवसात ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| चवळी | काढणी | दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता चवळी पिकाची काढणी येत्या २ दिवसात ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| कडवा वाल | काढणी | दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता वाल पिकाची काढणी येत्या २ दिवसात ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| मिरची | फुलोरा ते फळधारणा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. दयावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| दुभती जनावरे व कुक्कुटपालन | | दिनांक २२ व २३ मार्च, २०२१ या कालावधी दरम्यान मेघगर्जना व विजांच्या लखलखाटासह तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता जनावरांचे विजांपासुन संरक्षण करावे.<br>जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी. जनावरांचे व कोंबडयांचे दुपारच्या उष्णतेपासुन योग्य ते संरक्षण करावे. गोठयामध्ये व शेडमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |